संदर्भ - निविदा क्र. ०१/२०२६ (दुसरी मुदतवाढ)

जिल्हा व सत्र न्यायालय, बुलडाणा

पहा १. या न्यायालयाव्दारे बुलडाणा न्यायीक जिल्हयातील बुलडाणा, मलकापूर, मेहकर आणि खामगांव या ठिकाणी "National Mission for Safety of Women '' अंतर्गत महिलांवरील बलात्काराची व POCSO कायद्यांतर्गत बालकांवरील अत्याचाराची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी स्थापित विशेष जलदगती न्यायालयामध्ये "०३ -लिपीक टंकलेखक व ०२- बहुउद्देशिय गट-ड कर्मचारी (शिपाई इ.)" (प्रत्येक न्यायालयाकरिता) या प्रमाणे दोन वर्षाच्या कालावधीसाठी बाहययंत्रणेद्वारे उपलब्ध होवून मिळण्याकरिता मागविण्यात आलेल्या ऑनलाईन ई-निविदा क्र. ०१/२०२६.

२. ई-निविदा प्रक्रिया समिती, जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांची बैठक दिनांक २२/१०/२०२६ व त्यात पारीत ठराव.

शुध्दीपत्रक

दिनांक - २२/१०/२०२६

जिल्हा व सत्र न्यायालय, बुलडाणा ई-निविदा क्र. ०१/२०२६ अन्वये बुलडाणा न्यायीक जिल्हयातील बुलडाणा, मलकापूर, मेहकर आणि खामगांव या ठिकाणी "National Mission for Safety of Women '' अंतर्गत महिलांवरील बलात्काराची व POCSO कायद्यांतर्गत बालकांवरील अत्याचाराची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी स्थापित विशेष जलदगती न्यायालयामध्ये "**०३** -लिपीक टंकलेखक व **०२**- बहुउद्देशिय गट-ड कर्मचारी (शिपाई इ.)" (प्रत्येक न्यायालयाकरिता) या प्रमाणे दोन वर्षाच्या कालावधीसाठी बाहययंत्रणेद्वारे नोंदणीकृत आणि अनुभवी, कंत्राटदारांकडुन विहित नमुन्यात ऑनलाईन ई-निविदा, निविदेतील कागदपत्रांमध्ये निर्देशीत केल्याप्रमाणे दिनांक १२/१०/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजता पावतो (**प्रथम मुदत वाढ**) मागविण्यात आलेल्या होत्या.

सदर बाबत संदर्भ क्र. २ वरील दिनाक २२/१०/२०२६ रोजीचे बैठकीत पारीत ठरावाच्या अनुषंगाने निविदा प्रक्रियेचा पुढील टप्पा राबविण्याकरिता आवश्यक किमान निविदा विहित कालावधीत प्राप्त न झाल्यामुळे ई-निविदा ऑनलाईन सादर करण्याकरिता दिनांक २९/१०/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजता पावेतो (**दुसरी मुदतवाढ**) देण्यात येत आहे.

(श्रीचंद दौ. जगमलानी)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा
अध्यक्ष, ई-निविदा प्रक्रिया समिती, बुलढाणा

22/10/26
(ए ए. खंडाळे)
मुख्य न्यायदंडाधिकारी तथा
सदस्य ई-निविदा प्रक्रिया
समिती, बुलढाणा

(श्रीमती. जे. पी. शिराळे)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
तथा सदस्य ई-निविदा प्रक्रिया
समिती, बुलढाणा

(शेख अकबर शेख जाफर)
जिल्हा न्यायाधीश-१, तथा
सदस्य ई-निविदा प्रक्रिया
समिती, बुलढाणा